# मेट्रोत ५६३७ जणांची भरती

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला अधिकृत भरतीची अधिसूचना जारी करण्यात आली असून त्यामध्ये ५ हजार ६३७ कुशल आणि अकुशल कामगार पदासाठी भरती काढण्यात आली आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी घेण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे मुंबई मेट्रोसाठी काम करणाऱ्या परप्रांतीय कामगारांनी आपले गाव गाठले. त्यामुळे मुंबई मेट्रो ३ च्या कामांना काहीअंशी खिळ बसली. मात्र आता याच लॉकडाऊनमुळे महाराष्ट्रातील तरुणांना मुंबई मेट्रो-३ साठी काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सध्या कुलाबा -वांद्रे-सीप्झदरम्यान सुरू असणाऱ्या मेट्रो ३ प्रकल्पाला मजुरांचा तुटवडा भासत असल्याने प्रकल्पातील महत्त्वाच्या टप्प्यातील कामे करण्यासाठी कुशल आणि अकुशल अशा दोन्ही प्रकारच्या कामगारांची भरती करण्यासाठी मेट्रो ३ मार्फत सुरुवात झाली आहे.

मार्गावरील भुयारी स्थानके, एनएटीएम व बोगद्यामध्ये कुशल आणि अकुशल कामगारांची आवश्यकता आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने हा तुटवडा भरून काढण्यासाठी पुढाकार घेतला असून मुंबईतील तसेच महाराष्ट्रातील कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही कामगार भरती करण्याचा निर्णय मेट्रो ३ प्रशासनामार्फत घेण्यात आला आहे.

गवंडी, सुतार काम, फिटर, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, वायरमन, अकुशल कामगार, रिगर, पाईप फिटर, क्रेन ऑपरेटर अशा पदांसाठी ही भरती प्रक्रिया मेट्रोमार्फत सुरू करण्यात आली आहे.

**● मेट्रो मार्गावर स्लॅब, अंतर्गत भिंती, सरकते जिने, कॉंक्रिटीकरण, वायरिंग, वेल्डिंग अशा कामांसाठी कुशल कामगारांची आवश्यकता आहे. शिवाय अकुशल कामगारांचीही मेट्रो ३ च्या कामात गरज भासणार आहे. एकूण ५ हजार ६३७ कामगारांची भरती करण्यात येणार आहे. त्यामध्ये सर्वाधिक फिटर २ हजार ३८ तर अकुशल कामगार १ हजार ८७७ इतक्या मोठ्या प्रमाणात कामगारांची गरज या मेट्रोच्या कामासाठी भासणार आहे. सुतार काम करणारे ८०४ तर रिगर म्हणून काम करणारे ३१२ कामगार सध्या एमएमआरसीला हवे आहेत.**